# प्रभात

मंगळवार । दि. ५ ऑक्टोबर २०२१


# कर्मवीर ग्रामीण विद्यापीठाची घोषणा रा

## ना. उदय सामंत यांची सहकार्याची ग्वाही; 'रयत'चा वर्धा

सातारा, दि. ४ (प्रतिनिधी) - रोजगार निर्मिती करणारे, तंत्रज्ञानावर आधारित, कौशल्ययुक्त शिक्षण देत, रयत शिक्षण संस्थेने लाखो विद्यार्थी सामाजिक प्रवाहात आणले आहेत. संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली ही संस्था देशाचे भूषण आहे. स्वतंत्र कर्मवीर ग्रामीण विद्यापीठ स्थापन करण्याची घोषणा राज्य सरकारकडून केली जाणार आहे. त्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

रयत शिक्षण संस्थेच्या १०२ व्या वर्धापनदिनानिमित्त यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये सोमवारी झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.



सातारा : रयत विज्ञान पत्रिकेचे प्रकाशन करताना ना. उदय सामंत, डॉ. अनिल पाटील, रामशेठ ठाकूर व मान्यवर. (छाया : प्रकाश वायदंडे)

आ. बाळाराम पाटील, संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, सहसचिव प्राचार्या डॉ. प्रतिभा गायकवाड, ऑडिटर प्राचार्य शिवलिंग मेनकुदळे, रामशेठ ठाकूर व मान्यवर उपस्थित होते. ना. सामंत म्हणाले, डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण क्षेत्रातील काम अमूल्य आहे. या संस्थेत साडेचार


ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा

त

प्र
ब
व

# ाची घोषणा राज्य शासन करणार

## ाची ग्वाही; 'रयत'चा वर्धापनदिन उत्साहात



, डॉ. अनिल पाटील, रामशेठ ठाकूर व मान्यवर. (छाया : प्रकाश वायदंडे)

डटर
रामशेठ
ोते. ना.

सामंत म्हणाले, डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण क्षेत्रातील काम अमूल्य आहे. या संस्थेत साडेचार लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. देशातील विद्यार्थी शिक्षणासाठी विदेशातील विद्यापीठांमध्ये जातात. भविष्यात रयत शिक्षण संस्था पाहण्यासाठी विदेशातील विद्यार्थी येथे येतील. मुंबई, पुणे येथील विद्यार्थीही रयत शिक्षण संस्थेत शिक्षणासाठी येतील.

राज्यातील सर्व विद्यापीठे सक्षम बनविण्यात येत आहेत. ग्रामीण भागात शिक्षण व रोजगार निर्मितीसाठी स्वतंत्र कर्मवीर ग्रामीण विद्यापीठाची घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे करणार आहेत. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी राज्य शासन सहकार्य करेल.

डॉ. अनिल पाटील म्हणाले, रयत शिक्षण संस्थेच्या वाटचालीत समाजाच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी वर्धापनदिन साजरा केला जातो.

संस्थेच्या जडणघडणीत प्रबोधनकार ठाकरे यांचे मोलाचे योगदान होते. संस्थेत काळानुसार मुलांना शिक्षण देण्यात येते. दरम्यान, २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात उल्लेखनीय काम करणारे शिक्षक व विद्यार्थ्यांचा सत्कार सामंत यांच्या हस्ते करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते रयत विज्ञान पत्रिकेचे प्रकाशन व ई-रयत ॲपचे लोकार्पण करण्यात आले. डॉ. शिवणकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. गायकवाड यांनी आभार मानले.

ाचार्य
वाजी कॉलेज,
ातारा